|| विद्या विनयेन शोभते ||
SHETH T. J. EDUCATION SOCIETY'S
SHETH NANJIBHAI KHIMJIBHAI THAKKAR THANAWALA COLLEGE OF COMMERCE &
SHETH JAYANTILAL TRIBHOVANDAS THANAWALA COLLEGE OF ARTS
Kharkar Ali, Thane (W) - 400 601
A Linguistic Minority Institute, Recognized under 2(f) and 12(b) of the UGC act 1956
Tel.: 25431119, Website : www.nktdegreecollege.org Email:- nkttdg@yahoo.co.in
Re-Accredited by NAAC with CGPA 2.62, B+ Grade (3rd Cycle)
ISO 9001: 2015 Certified

Dr. DILIP M. PATIL
M.Sc. Ph.D.
PRINCIPAL

No. NKT/MVM/ 12 /2021-22 Date :-11th June, 2021

प्रति,
माननीय विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
कोकण विभाग,
पनवेल

**विषय - शिवस्वराज्य दिन साजरा केल्याबद्दल**

**संदर्भ – पत्र क्र. विससं/उशि/कोपिव/मशि/२०२१/१११२ - दिनांक ०४/०६/२०२१**

माननीय महोदय,

आपल्या वरील पत्राच्या अनुषंगाने आमच्या महाविद्यालयात "शिवस्वराज्य दिन" दिनांक ६ जून २०२१ रोजी साजरा करण्यात आला. कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर केंद्र आणि राज्यशासनाच्या वेळोवेळी सूचनांप्रमाणे सर्व प्रतिबंधक उपायांचे पालन करून हा दिवस ऑनलाइन माध्यमातून साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचा अहवाल आणि काही छायाचित्रे या पत्राबरोबर जोडत आहोत.

धन्यवाद.

आपले विश्वासू,

सौ. गीतांजली चिपळूणकर
समन्वयक, मराठी वाङ्मय मंडळ

डॉ. दिलीप पाटील
प्राचार्य

PRINCIPAL
SHETH T.J. EDUCATION SOCIETY'S
SHETH N.K.T.T. COLLEGE OF COMMERCE &
SHETH J.T.T. COLLEGE OF ARTS, THANE (W)

<u>शिवस्वराज्य दिन अहवाल</u>

शेठ टी. जे. एज्युकेशन सोसायटीच्या शेठ एन. के. टी. टी. वाणिज्य महाविद्यालय आणि शेठ जे. टी. टी. कला महाविद्यालयाच्या मराठी वाङ्मय मंडळाने रविवार, दिनांक ६ जून २०२१ रोजी ऑनलाईन माध्यमातून "शिवस्वराज्य दिन" साजरा केला. हा कार्यक्रम गुगल मीट वर सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पाटील हे होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. धनश्री सावंत यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि त्यांची नीती यावर माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पाटील यांनी सुद्धा छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल मौल्यवान अशी माहिती देऊन श्रोत्यांशी सुसंवाद साधला.

तृतीय वर्ष बँकिंग आणि इन्शुरन्स ची विद्यार्थिनी कु. भाविक चौगुले हिने तिच्या सुंदर आवाजात महाराष्ट्र गीत सादर केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचे महान कार्य विद्यार्थ्यांच्या मनावर प्रतिबिंबित व्हावे यादृष्टीने मराठी विषयाच्या सहाय्यक प्राध्यापिका सौ. सुमती कांबळे यांनी महाराजांच्या राज्याभिषेकामागील इतिहास, तसेच महारांजाच्या गुण, त्यांनी अवलंबलेली धोरणे आणि त्यांची कीर्ती यावर सुंदर असे व्याख्यान दिले.

कार्यक्रमाचा शेवट आभार प्रदर्शनाने करण्यात आला. मराठी वाङ्मय मंडळाच्या समन्वयक सौ. गीतांजली चिपळूणकर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन द्वितीय वर्ष वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी कु.तनुजा तांडेल हिने केली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताच्या गायनाने झाली.

या कार्यक्रमास एकूण १५३ श्रोते उपस्थित होते. ज्यामध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक अश्या सर्वांनी आपला सहभाग नोंदवला.

सदर कार्यक्रमानंतर महाविद्यालयातील बऱ्याच लोकांनी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने यूट्यूब आजोयित द्वारे केलेल्या "शिवस्वराज्य दिन सोहळ्यात" आपली उपस्थिती नोंदवली.

सौ. गीतांजली चिपळूणकर
समन्वयक, मराठी वाङ्मय मंडळ

डॉ. दिलीप पाटील
प्राचार्य

PRINCIPAL
SHETH T.J. EDUCATION SOCIETY'S
SHETH N.K.T.T. COLLEGE OF COMMERCE &
SHETH J.T.T. COLLEGE OF ARTS, THANE (W)


You're presenting to everyone
Google
Thane, Maharashtra, India
Siddhivinayak Tower, Runwal Nagar, Thane West, Thane, Maharashtra 400601, India
Lat N 19° 12' 33.9372"
Long E 72° 58' 27.4476"
06/06/21 10:29 AM


You're presenting to everyone
Google
Thane, Maharashtra, India
Siddhi Vinayak Tower, D N Nagar, Runwal Nagar, Thane West, Thane, Maharashtra 400601, India
Lat N 19° 12' 33.2748"
Long E 72° 58' 27.4476"
06/06/21 10:09 AM


10:30 AM
hna-xgvq-gcm
REC


Jupiter Hospit
Google
Thane, Maharashtra, India
Siddhi Vinayak Tower, D N Nagar, Runwal Nagar, Thane West, Thane,
Maharashtra 400601, India
Lat N 19° 12' 32.742"
Long E 72° 58' 27.4476"
06/06/21 10:15 AM